# <u>प्रेसनोट</u>

दि.०७/०६/२०२२

## सजा - टोकावडे, ता. खेड, जि. पुणे येथील तलाठ्यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - २६ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - सुजित सुधाकर अमोलिक, वय - ५० वर्षे<br>पद - तलाठी, सजा - टोकावडे, ता. खेड, जि. पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- ( पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४,०००/- (चार हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- ०६/०६/२०२२
सापळा दिनांक :- ०७/०६/२०२२
ठिकाण :- खेड तलाठी कार्यालय.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या आजोबांनी खरेदी केलेल्या शेतजमिनीची सातबारा सदरी नोंद करणेकरीता लोकसेवक तलाठी अमोलिक यानी ५ हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांच्या आजोबांनी खरेदी केलेल्या शेतजमिनीची सातबारा सदरी नोंद करणेकरीता आरोपी लोकसेवक सुजित अमोलिक यानी ५ हजार रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४ हजार रूपयांची लाच रक्कम मागणी करून स्वीकारलेवर ताब्यात घेण्यात आले असून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक ज्योती पाटील तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **<u>dyspacbpune@mahapolice.gov.in</u>**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.